# पिंजरा

तुम्ही मुक्त असलाच असे नाही.

कदाचित तुमचा पिंजरा मोठा असू शकतो.

पिंजरा एक बंदिवान अवस्थेचे प्रतीक. पूर्ण निर्बंध नाही परंतु पूर्ण स्वातंत्र्यही नाही.

पिंजरा म्हटले की पोपट आठवतोच. पोपटाला काहीही बोलायची मुभा, मात्र त्या पिंजऱ्याच्या बाहेर जायची सोय नाही.

प्रत्येक माणसाला कुठल्या न कुठल्या अवस्थेत एक पिंजरा असतोच.

माणूस श्रीमंत वा गरीब, प्रत्येकाला त्याचा एक पिंजरा असतोच. गरीब माणूस ज्याला उद्याची काळजी, त्याला जगाची तमा नाही; मात्र परिस्थितीमुळे एका परिघात जखडला गेलाय. जीवन जगताना आर्थिक परिस्थितीमुळे लादलेल्या निर्बंधांमुळे त्याला एका आश्रितासारखेच राहावे लागते, त्याचे आश्रिताचे जीवनमान हा एक पिंजराच. तसेच आर्थिक सुस्थितीत असलेला धनिक, त्याला आर्थिक स्वातंत्र्य असले तरी जगात वावरताना रीतिरिवाज, सामाजिक प्रतिष्ठेचे भान आणि त्यासाठी सतत दाखवावी लागणारी सजगता, हा पण त्याचा एक पिंजराच.

राजा असो वा रंक, प्रत्येकाला एक पिंजरा आहेच. रंकाला त्याच्या जीवनातील जगण्याच्या मर्यादेच्या पिंजरा तर राजाला प्रजेकडून असलेल्या अपेक्षा आणि एक आदर्शवादी व्यक्तित्व जोपासण्याचा मर्यादेचा पिंजरा.

बालवयात कितीही स्वातंत्र्य असले तरी एक परावलंबित्व असणे, हे एक पिंजऱ्याचे प्रतीकच आहे. तरुण वयात, उमेदीच्या काळात, जगाकडून असलेल्या अपेक्षा आणि त्या अपेक्षेचे दडपण म्हणजे एक पिंजराच.

संसार करताना त्या व्यक्तीला कुटुंबाची आणि आप्तजनांची जबाबदारी आणि सांभाळ, हा त्या व्यक्तीचा पिंजराच.

एखाद्या साधू किंवा धार्मिक गुरूला त्याची तत्वं, आदर्श ह्या मर्यादेत राहण्याची सजगता, हा एक पिंजराच.

समाज आणि आणि समाजाने आखून दिलेले नितीमूल्य ह्यांची जोपासना करताना कुठल्या न कुठल्या अवस्थेत पिंजऱ्याची जाणीव होते.

म्हणूनच प्रत्येकाला जगताना एक पिंजरा असतोच. त्या पिंजऱ्याचा तो बंदिवान असतो.

एका मातेला बाह्य जगात नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडताना मुलांचे प्रेम, जिव्हाळा, माया ह्या नैसर्गिक ओढीचा एक पिंजराच असतो.

प्रत्येक व्यक्ती जगताना त्याच्या सामाजिक मर्यादा, आप्तजनाप्रती असलेली जबाबदारी, आर्थिक मर्यादा, कौटुंबिक मानमर्यादा अश्या आखलेल्या कुंपणात जगत असतो. ते कुंपण म्हणजे एक पिंजराच.

जगताना त्या कुंपणाच्या मर्यादेत जगणे म्हणजेच त्या बंदिस्त पिंजऱ्यात जगणे होय.

म्हणून तर म्हटलेच आहे ना, 'जग हे बंदिशाळा'

**मनोज कुरुंभटी**